



दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ




dainiklokaarambh@gmail.com | LOK AARAMBH | संपादक:राहुल मारोतीराव वाईकर | कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शुक्रवार ११ एप्रिल २०२५ | अंक १२० • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


# एसंशिं, युटी आता फुकटचा बाबुराव भर सभेत एकनाथ शिंदेंची तुफान टोलेबाजी



## ते FB म्हणजे फुकटचा बाबुराव

**खुर्च्या बदलल्या तरी दिल बदलले नाही. लाडकी बहीण योजना बंद होणार नाही. आम्ही जे बोललो ते सर्व देणार आहोत. फक्त थोडी थोडी परिस्थिती सुधारु द्या. कर्जमाफी असो किंवा काही घोषणा, त्या टप्प्याटप्प्याने पूर्ण करणार आहोत. आम्ही प्रिंटिंग मिस्टेक म्हणणार नाही. त्यांनी फेसबुक live करुन फेक नरेटीव पसरवले. ते FB म्हणजे फुकटचा बाबुराव आहेत, असा टोला एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना लगावला. मी देखील FB म्हणजे फेवरेट**

### बापू मोकळा ढाकळा माणूस

सांगोल्यांच्या लोकांचे प्रेम बघून एकदम ओके वाटत आहे. शहाजीबापू पडले असले तरी लोकांचे तुमच्यावर प्रेम आहे. एखाद्या मॅचमध्ये हरले म्हणून विराटची बॅट थंड पडत नाही. टायगर अभी जिंदा है. बापूंना मोकळे सोडणार नाही. बापू मोकळा ढाकळा माणूस आहे. आम्ही उठाव केला तेव्हा सारेजण तणावात होते, पण बापू विनोद करुन वातावरण तणावमुक्त करायचे, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

काय झाडी या डायलॉगमुळे तर आसामचे पर्यटन खूप वाढले आहे. आता तर बिल्डर देखील त्यांच्या जाहिरातीत बापूचा डायलॉग टाकताना दिसत आहेत. बापूंना हे माहीत नसावे नाहीतर रॉयल्टी मागितली असती, असेही एकनाथ शिंदेंनी म्हटले

सध्या महाराष्ट्रात एसंशि आणि युबीटी या दोन शब्दांवरुन राजकारण सुरु आहे. काही दिवसांपूर्वी एका पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदेंचा उल्लेख करताना एसंशि असा केला होता. तर दुसरीकडे यावरुन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी प्रतिक्रिया देताना युटी असा उल्लेख केला होता. तुमचा शॉर्टफॉर्म युटी होतो म्हणजे युज अँड थ्रो म्हणायचं का असा खोचक सवाल एकनाथ शिंदेंनी केला होता. या दोन शब्दांवरुन राजकारण रंगलेले असताना आता एकनाथ शिंदे यांनी पुन्हा एकदा उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला आहे.

एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सांगोल्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासह शिवसेना शिंदे गटाचे माजी आमदार शहाजीबापू पाटीलही उपस्थित होते. यावेळी एकनाथ शिंदेंनी जबरदस्त भाषण केले. या भाषणादरम्यान त्यांनी लाडकी बहीण योजना बंद होणार नाही. त्यांनी फेसबुक live करुन फेक नरेटीव पसरवले. ते FB म्हणजे फुकटचा बाबुराव आहेत, असा टोला लगावला.

# महादेव मंदिर भवर दर येथे आ.सुरेश धस यांच्या हस्ते भक्तनिवासचे लोकार्पण! कै.तुळशीराम हबाजी भवर यांच्या स्मरणार्थ उभा राहतंय भक्तनिवास

कुसळंब | प्रतिनिधी महाराष्ट्र राज्याचे माजी महसूल मंत्री आमदार सुरेश आण्णा धस यांच्या मार्गदर्शनाखाली पाटोदा तालुक्यातील विकास कामाला चालना मिळाली आहे. मुगगाव येथील महादेव मंदिर भवरा दरा येथे कै.तुळशीराम हबाजी भवर यांच्या स्मरणार्थ भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते भाऊसाहेब भवर यांच्या संकल्पनेतून दुसरे भक्तनिवास भक्तनिवासची उभारणी झाली असून त्याचं लोककार्पण 10/0 4/2025 रोजी होत आहे तरी सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. मुगगाव येथील महादेव मंदिर भवर दरा येथे आमदार सुरेश आण्णा धस यांच्या माध्यमातून अनेक विकास





कामे पूर्ण झाले आहेत. आता दुसरे भक्त निवास देखील उभा राहिले आहे. या भक्तनिवासाचा लोकार्पण सोहळा 10 4 2025 रोजी माजी महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य आमदार सुरेश आण्णा धस यांच्या शुभहस्ते होणार असून या कार्यक्रमाचे अध्यक्ष ह भ प ज्ञानेश्वर माऊली कुलकर्णी हे असणार आहे. मुगगाव अठ्ठेगाव पुठ्ठा सह पाटोदा तालुक्यातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत तरी परिसरातील सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने या भक्तनिवास च्या लोकार्पण सोहळ्यासाठी उपस्थित राहावे असे आव्हान भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते भाऊसाहेब अण्णा भवर यांनी केले आहे.

### अण्णा येत आहेत आपणही या : भाऊसाहेब भवर

महादेव मंदिर भवर दरा येथे उभारलेल्या भक्त निवासाचे लोकार्पण माजी महसूल राज्यमंत्री आमदार सुरेश आण्णा धस यांच्या हस्ते 10/04/2025 रोजी होत असून परिसरातील सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाची शोभा वाढवावी, अण्णा येत आहेत आपणही या असे आव्हान ज्येष्ठ नेते भाऊसाहेब भवर यांनी केले आहे.

### अखंड हरिनाम सप्ताह व लोकार्पण

महादेव मंदिर भवर दरा येथे अखंड हरिनाम सप्ताह व भक्त निवासाचे लोकार्पण 10/ 4/ 2025 रोजी दुपारी 2 वाजता होणार आहे. तसेच भक्तनिवास पहिले व दुसरे हे ज्येष्ठ नेते भाऊसाहेब पवार यांच्या स्वखर्चातून उभारले असल्याने नागरिकांमधून भाऊसाहेब अण्णांवर शुभेच्छांचा वर्षाव केला जात असून या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार

# गुन्हेगारांचा बीड जिल्हा ही ओळख पुसण्याचा प्रयत्न सुरेश जाधव यांनी केला - उल्हास गिराम



बीड : महाराष्ट्र टीव्ही जार्नालिझमची मातृसंस्था असलेल्या टिव्ही जार्नालिझम असोसिएशन महाराष्ट्र राज्य च्या वतीने दिला जाणारा महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट ग्रामीण पत्रकार प्रथम पुरस्कार बीडचे भूमीपुत्र सुरेश महाराज जाधव (न्यूज 18 लोकमत बीड जिल्हा प्रतिनिधी) यांना मिळाला. त्याबद्दल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे बीड जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी जाधव यांचा सत्कार केला. पत्रकार सुरेश जाधव यांनी बीड च्या पत्रकरिता क्षेत्रात मनाचा तुरा रोवला असुन, गुन्हेगारांचा बीड जिल्हा ही ओळख पुसण्याचा प्रयत्न सुरेश जाधव यांनी केला असल्याचे उल्हास गिराम यांनी सांगितले. यावेळीजिल्हा समन्वयक संजय महाद्वार, उपजिल्हा प्रमुख राजु भाऊ माहुवाले, संदीप उबाळे, सतीशसिह परदेशी यांनी ही पत्रकार जाधव यांना शुभेच्छा दिल्या.

# कु. ऋतुजा गायकवाड ने नवोदय परीक्षेत मारली बाजी, आ.अब्दुल सत्तार यांच्या हस्ते सत्कार

सिल्लोड.. कन्नड येथील जवाहर नवोदय विद्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या प्रवेश चाचणी परीक्षेत लिटलं वंडर इंग्लिश स्कूल सिल्लोड या शाळेतील विद्यार्थिनी,कु ऋतुजा सुधाकर गायकवाड हिने यश संपादन केले, छत्रपती संभाजीनगर जिल्यातील कन्नड येथील नवोदय विद्यालयात प्रवेशासाठी मेहनत, जिद्द व चिकाटीने अभ्यास करून ती



पात्र ठरली आहे, याबद्दल ऋतुजा हिचा माजी मंत्री आमदार अब्दुल सत्तार साहेब यांच्या हस्ते पालकांसहित सत्कार करण्यात आला. तसेच शाळेचे अध्यक्ष, शंस्था सदस्य, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या वतीने सत्कार करण्यात आला,, यावेळी निवृत्त प्राचार्य नामदेवराव चापे सर, संस्थाचालक श्री. कृष्णा लहाने सर, 1008 महामंडलेश्वर मंगरूळकर शास्त्री महाराज, गटनेते नंदु सहारे, ह.भ.प. देविदास महाराज मिसाळ, उपजिल्हाप्रमुख सुदर्शन आग्रवाल, सरपंच दत्ता कुडके, दिलीप वाघ, मा नगरसेवक प्रशांत क्षीरसागर, सामाजिक कार्यकर्ते जगदीशजी बेदवे शहरातील प्रतिष्टीत मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती...

# श्रीक्षेत्र नारायण गडाचा ७३ वा नारळी सप्ताह प्रारंभ !

शिरूर कासार तालुक्यातील राक्षसभुवन येथे श्रीक्षेत्र नारायण गडाचा ७३ वा नारळी सप्ताह महंत शिवाजी महाराज यांचे अध्यक्षतेखाली प्रारंभ झाला .भक्तगण नारायण नारायण नगद नारायण या भजनाने भक्तिसागरात न्हाऊन निघाले होते. नारायण गडावरून महंत शिवाजी महाराज व संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांचे हेलिकॉप्टर ने सप्ताह स्थळी आगमन झाले .शिस्तबध्द आणि परंपरेच्या चौकटीत नारळी सप्ताहाला पहिल्याच दिवशी रेकॉर्ड ब्रेक गर्दि दिसून आली . हेलिपॅड पासुन टाळ मृदंग बॅण्ड असी



सवाद्य मिरवणूक शोभायात्रेने राक्षसभुवनला आनंदाचे उधान आले होते .देवघरात यथाविधी स्थापना झालेनंतर मुख्य कीर्तन व्यासपिठावर शिवाजी महाराज व मनोज जरांगे पाटील यांचे आगमन झाले ,गडाचे उत्तराधिकारी संभाजी महाराज यांचे हस्ते टाळ विणा मृदंग व ग्रंथ पुजन करण्यात आले .यावेळी श्रीराम संथानचे महंत भानुदास शास्त्री ,ज्ञानेश्वर आश्रम चे महंत नारायण महाराज डीसले आदी संत महंताची उपस्थिती होती ,वे शा सं बाळूदेवा मुळे यांनी सांगोपांग पुजाविधी केला आणि पुंडलीक वरदा असा जयघोष करून फुलांचा वर्षाव केला . आयोजक राक्षसभुवन ग्रामस्थ सेवेसाठी तत्पर असुन येणाऱ्या भाविकांची सेवा करणार आहेत .ज्ञानदाना बरोबर अन्नदानालाही महत्व दिले जाणार असुन नगद नारायण महारांजाची सेवा समजून ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत.

# बीड लोकसभा मतदारसंघात आरोग्यसेवा इमारती बांधकामासाठी २२.४० कोटी निधी मंजूर - खा. बजरंग सोनवणे

बीड: बीड लोकसभा मतदारसंघातील नागरिकांना उत्तम आरोग्यसेवा मिळावी, यासाठी प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच हेल्थ युनिटच्या स्वतंत्र आणि मजबूत इमारती असण्याची गरज लक्षात घेऊन केंद्र सरकारच्या राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत १५व्या वित्त आयोगातून जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांच्या बळकटीकरणासाठी २२ कोटी ४० लाखांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यासाठी खा. बजरंग सोनवणे यांनी पाठपुरावा केला आहे.



या निधीमुळे ग्रामीण व शहरी भागातील आरोग्यसेवा सुधारण्यास मोठा हातभार लागणार आहे. बीड जिल्ह्यातील सर्वच विधानसभा मतदारसंघातील आरोग्य केंद्र, उपकेंद्र इमारतींसाठी हा निधी वितरित करण्यात आला आहे. केज विधानसभा संघात २ कोटी ८३ लाख, बीड विधानसभा मतदारसंघात २ कोटी ९१ लाख, माजलगाव विधानसभा मतदारसंघात २ कोटी ३३ लाख, आष्टी विधानसभा मतदारसंघात १० कोटी ८२ लाख, परळी विधानसभा मतदारसंघात १ कोटी १७ लाख तर गेवराई विधानसभा मतदारसंघात २ कोटी ३३ लाख रूपये मंजूर करण्यात आले आहेत. या निधीमधून प्रस्तावित करण्यात आलेली कामे विहित वेळेच्या आत व निश्चित करण्यात आलेल्या दर्जानुसार पूर्ण होतील अशी माहिती खा.बजरंग सोनवणे यांनी दिली. या निधीतून निर्माण होणाऱ्या सुविधांमुळे ग्रामीण भागातील आरोग्यसेवा अधिक सक्षम होणार आहे. जिल्ह्यातील नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा मिळाव्यात, यासाठी खा.बजरंग सोनवणे यांनी लोकसभा निवडणूकीनंतर जिल्ह्यातील रूग्णालयाचा आढावा घेतला होता. शिवाय आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला अचानक भेट देवून त्याठिकाणी रूग्णालय इमारतीचा प्रश्न लक्षात घेत जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या इमारतींचा प्रश्न मार्गी लावण्यासंदर्भात पाठपुरावा सुरू केला होता. या पाठपुराव्याला यश आले असून आता जिल्ह्यातील गरज असलेल्या ३३ आरोग्य उपकेंद्रांना इमारती मिळणार आहेत.

## संपादकीय

### जिल्हा वार्षिक निधीलाही कात्री लागणार

अर्थसंकल्पामध्ये केलेल्या वार्षिक तरतुदींच्या केवळ साठ टक्के निधीच वितरित करण्याबाबतच्या अर्थ खात्याच्या नव्या परिपत्रकाने सक्तीच्या बचतीचा आदेश सर्व विभागांना दिला आहे. त्यातून राज्याची खालावलेली आर्थिक स्थिती आणि तिजोरीवरचा वाढत चाललेला भार यांची कल्पना येते. गेल्या महिन्यात अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर, कोणी अधिक निधी खेचला, याबाबतची चर्चा रंगली होती; पण तेव्हा विजयी मुद्रेने वावरणाऱ्या अनेक मंत्र्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद नव्या परिपत्रकाने मावळला असणार. त्यासोबतच आमदार निधी आणि जिल्हा वार्षिक निधीलाही कात्री लागणार असल्याने प्रत्येक जिल्ह्यात आखलेल्या योजनांसाठी निधीच्या तोंडमिळवणीचे आव्हान उभे राहणार आहे. या परिपत्रकानुसार, अर्थ खात्याने तुलनेने दुय्यम खर्चांना चाप लावण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. मोटार वाहनांची खरेदी, परदेशी प्रवासाचा खर्च, प्रशासकीय खर्च, प्रसिद्धी, प्रकाशने, जाहिराती आणि संगणक अशा खर्चांना ठोस कारणांशिवाय मान्यता देऊ नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे. केंद्र सरकार पुरस्कृत योजनांमधील राज्याचा वाटा आणि पंधराव्या वित्त आयोगाच्या तरतुदी पूर्ण करणे सरकारला भागच आहे. मात्र, अनेक अनुदाने, शिष्यवृत्ती, तसेच भांडवली खर्चाच्या विकासयोजना अशा आवश्यक खर्चांमध्ये काटछाट होणार नाही, याची काळजी सरकारला घ्यावी लागेल. राज्य सरकारच्या या आदेशाची योग्य अंमलबजावणी झाली, तर काही गोष्टी व्यवस्थेच्या पथ्यावरच पडणाऱ्या आहेत. यंत्रणेतील अनावश्यक खर्चांना कोठे तरी चाप लावणे गरजेचे होतेच; पण विविध विभागांमधील या उधळपट्टीवरच जगणाऱ्या अनेकांची यामुळे आबाळ होणार! अनावश्यक वाहने, संगणक, कार्यालयीन सजावट यांपासून ते स्टेशनरीपर्यंत प्रत्येक खरेदीमध्ये हात मारणारे ठेकेदार, त्यातील मलई खाणारे अधिकारी यांच्या टोळ्यांचे व्यवहार कदाचित थांबू शकतात. त्याप्रमाणेच उठसूट प्रत्येक लहानमोठ्या गोष्टींची जाहिरातबाजी करणाऱ्या ‌‌‘चमकोफ मंडळींनाही लगाम बसू शकतो. सोबतच सर्व विभागांना वार्षिक खर्चाचे नियोजन करण्याचेही सरकारने बजावले आहे. वर्षभर निवांत रहायचे आणि फेब्रुवारी-मार्चमध्ये तरतुदी संपविण्यासाठी वाघ मागे लागल्यासारखे खर्च करण्याची अनागोंदी यातून थांबू शकेल. खरे तर राज्य सरकारने हीच संस्कृती स्थानिक स्वराज्य संस्थांनाही बंधनकारक केली पाहिजे, त्यातून किमान मार्चमध्ये खर्चाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी सारी शहरेच खणून ठेवल्याचे चित्र तरी पाहावे लागणार नाही. कल्याणकारी योजनांचा राज्याच्या तिजोरीवर आलेला ताण आणि आर्थिक वास्तव-भविष्याचे आलेले भान, हे सरकारच्या आदेशामागील खरे कारण आहे. राज्याच्या अर्थसंकल्पातला मोठा वाटा ‘लाडकी बहीणफ योजनेवर खर्च होत आहे. गेल्या वर्षी ४६ हजार कोटी रुपयांची तरतूद केल्यानंतर यंदा ३६ हजार कोटी रुपयांची तरतूद त्यासाठी करण्यात आली आहे. नव्याने लाभार्थींची कठोर छाननी आणि दुहेरी योजनांच्या लाभार्थींना वगळण्यासारख्या मार्गांनी त्यात थोडीफार बचत होऊ शकते. त्याचबरोबर पूर्वीच्या घोषणेनुसार मिळू शकणारे दरमहा २१०० रुपये आता विसरा, असा संदेशही नव्या परिपत्रकात दडला आहे. हा खर्च दीर्घ काळ पेलवणे सरकारला जवळपास अशक्य आहे. मात्र, त्याची कबुली देणे राजकीयदृष्ट्या परवडणारे नसल्याने सरकार सापळ्यात अडकले आहे. दुसरीकडे सध्या राज्यावरील पावणेआठ लाख कोटी रुपयांचे कर्ज यंदा नऊ लाख कोटी रुपयांवर जाण्याची शक्यता असून, त्याची व्याजासह परतफेड करताना सरकारची दमछाक झालेली दिसते. उत्पन्नापेक्षा खर्च अधिक झाल्याने महसुली तुटीचा सामना करावा लागत आहे; त्याबरोबरच कर संकलनात अपेक्षित वाढ न होणे, हे चिंतेचे आणखी एक कारण. अमेरिकेसह जगभरात होणाऱ्या घडामोडी पाहता विकासाला खीळ बसून मंदीसदृश स्थितीची चाहूल लागली आहे. त्यातून उद्योग व सेवाक्षेत्राची वाढ मंदावली, तर त्याचा परिणाम करसंकलनावरही होणार आहे. प्राथमिक अंदाजानुसार यंदा सरासरीइतका पाऊस राहण्याची शक्यता असल्याने खरीप चांगला झाला, तर सकारात्मक परिणाम दिसतील. वस्तू व सेवाकराची रचना लागू झाल्यानंतर राज्य सरकारच्या उत्पन्नाचे मार्ग आक्रसले असून, सध्याच्या निधीवाटपाच्या निकषांमुळे केरळ, तमिळनाडू या राज्यांप्रमाणेच महाराष्ट्रालाही कमी निधी मिळत असल्याची तक्रार आहे.

# जगणं दुनियादारीचं हे पुस्तक नव्या पिढी साठी प्रेरणादायी ठरेल- प्रा संतोष देवराये

प्रसिद्ध लेखक,समीक्षक, पुरोगामी चळवळीतील धडाडीचे कार्यकर्ते सोनू दरेगावकर लिखित जगणं दुनियादारीचं हे पुस्तक तरूण पिढीसाठी व्यक्तिमत्व विकासाच्या वाटा दाखवणारे ठरेल. सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून काम करणारे लेखक सोनू दरेगावकर एक प्रामाणिक आणि सोज्वळ व्यक्तिमत्व म्हणून आम्हा मित्र परिवारासह सबंध नांदेड जिल्ह्यात परिचित आहेत.

समाजातील प्रश्नाकडे सूक्ष्म दृष्टीने पाहणारा संवेदनशील मनाचा माणूस,भविष्याचा वेध घेणारा सिद्धहस्त लेखक म्हणून सोनू दरेगावकर यांच्याकडे पाहिले जाते.

आशयबोध असे सुंदर मुखपृष्ठ आणि त्यावरील बोलकी चित्रं हे या पुस्तकामध्ये काय दडले आहे हे सांगून जातात. मुखपृष्ठावर अगदी वरच्या बाजूला “माणसात वाद नाही संवाद हवा!” हे वाक्य पुस्तकाची दिशा अधोरेखित करते.

अगदी शुल्लक आणि जुजबी गोष्टीसाठी वाद घालून प्रश्न वाढवणाऱ्यांची संख्या समाजात खूप मोठ्या प्रमाणात वाढली आहे. छोट्याछोट्या प्रश्नाला वाढवत मोठं करणे आणि त्यामध्ये वेळ, श्रम, पैसा याचा अपव्यय करणे हल्ली काही लोकांची फॅशन झाली आहे.


या वादात वेळ, श्रम, पैसा तर जातोच, पण कधीही न भरून येणारा मनस्ताप मात्र अनेक आजाराला निमंत्रण देऊन जातो.

या पुस्तकातून सुंदर संदेश दिला आहे,की लोकांमधला वाद कमी होऊन समाजातला संवाद वाढला पाहिजे.

हल्ली सामाजिक पातळीवर आपण पाहायला गेलो, तर जातीय आणि धार्मिक विद्वेष पसरवण्याचं पद्धतशीर षडयंत्र काही व्यवस्थेकडून सुरु आहे. भलेही त्यांना त्यांचा राजकीय फायदा घ्यायचा असला,तरी यामध्ये मात्र अनेक वर्षापासून गुण्यागोविंदाने एकत्र नांदणारे दोन समाज मात्र परस्परांच्या विरोधात दंड थोपटून उभे राहत आहेत. अनावश्यक गोष्टीवर चर्चा घडवून सामाजिक सलोखा बिघडवला जात आहे.जातीय आणि धार्मिक सलोखा नष्ट होईल या पद्धतीची वक्तव्य केली जात आहेत.अश्लाघ्य स्वरूपाच्या टिप्पण्या जाहीररित्या केल्या जात आहेत.

कथा,कादंबऱ्या,पुस्तके मालिका अथवा चित्रपटातून दोन समाज परस्परांच्या विरोधात कसे उभे राहतील अशा स्वरूपाचे भडक दृश्य दाखवले जात आहेत.या गोष्टी हेतू पुरस्सर केल्या जात आहेत. अशा काहीशा कठीण परिस्थितीमध्ये या पुस्तकातून दिलेला संदेश नक्कीच राज्य आणि राष्ट्र बांधणीसाठी खूप मोलाचा ठरेल असे वाटते. सोनू दरेगावकर यांनी या पुस्तकात चारोळ्याच्या माध्यमातून संदेश दिला आहे. हा संदेश प्रत्येकाच्या सुंदर आणि निरामय आयुष्यासाठी मोठी शिदोरी ठरणार आहे.

सदर पुस्तक अक्षर ओळख झालेल्या लहान मुलापासून ते अगदी शेवटच्या उंबरठ्यावर गेलेल्या वयस्क, वृद्ध पिढीपर्यंत उपयोगी ठरणारे आहे. बोलकी चित्रं आणि त्यांना समर्पक असा मजकूर वाचकाला खेळवून ठेवतो.




आकर्षक आणि विचार प्रवर्तक मुखपृष्ठ, सहज हाताळता येईल असा पुस्तकांचा सुंदर आकार, सुरेख मांडणी हे या पुस्तकाची काही मुख्य वैशिष्ट्ये सांगता येतील. ग्रामीण भागातून आणि सर्वसामान्य कुटुंबातनं आलेला लेखक समाजाप्रती कायम कृतज्ञ आहे. सदर पुस्तक त्यांनी आपल्या जन्मदात्या पित्याला म्हणजेच जनसेवक बबन खंडू दरेगावकर यांना अर्पण केले आहे. यातून लेखकांची त्यांच्या वडिलांच्याप्रती कृतज्ञता स्पष्ट होते.

आपण समाजाचं काहीतरी देणे लागतो या भावनेने गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक चळवळीत सक्रिय काम करणारे सोनू दरेगावकर हे उपेक्षित,वंचित समाजातील अनेक नव्या चेहऱ्यांना पुढे आणून त्यांना सन्मानित करत असतात. अंधारात चाचपडणाऱ्या लोकांना ते आशेचा मार्ग दाखवत असतात. सर्वसामान्य शेतकरी, कष्टकरी मजूर, बहुजन वर्ग त्यांच्या कायमच केंद्रस्थानी असतो.प्रतिवर्षी ते विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार करून त्यांना सामाजिक बांधिलकीची जाणीवही करून देत असतात.अतिशय कष्टाने, जिद्दीने, मेहनतीने आणि अनेक संकटावर मात करून यश प्राप्त करणाऱ्या यशवंतांचा ते प्रतिवर्षी गौरव करून त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देतात. त्यांचा हा सत्कार समारंभ अतिशय नेटका आणि प्रेरणादायी असतो. पुणे येथील नामांकित अशा स्वंयदीप प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या या वैचारिक पुस्तकाला शिक्षण तज्ञ, माजी शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेड सर यांची विचार प्रवर्तक अशी प्रस्तावना आहे,तर बहुजन समाजातील प्रख्यात विचारवंत, लेखक,अभ्यासू व्यक्तिमत्व तथा यशदा पुणे येथील वरिष्ठ अधिकारी डॉ. बबन जोगदंड यांनी सोनू दरेगावकर यांची पाठराखण केली आहे. समाज मनाचा ठाव घेणारे हे पुस्तक प्रकाशना पूर्वीच आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचले आहे. या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा साऱ्या जगाचं आकर्षण असणाऱ्या दुबई या श्रीमंत शहरात संपन्न झाला.

आपली डोळे सदैव उघडे ठेवून समाजमन वाचणारे लेखक सोनू दरेगावकर यांच्या नजरेतून ग्रामीण भागातले अनेक प्रश्न,अडचणी उजागर झाल्या आहेत. माणूस म्हणून पुढे जायचे असेल तर केवळ एकट्याने पुढे न जाता कुटुंबाला, समाजाला पुढे घेऊन चाललो तर त्यातून राष्ट्रीय उन्नती साधता येईल.अशा स्वरूपाचे अनेक सुंदर वचने या पुस्तकात पावलोपावली पाहायला मिळतात. ज्यांनी आपलं सारं आयुष्य काळया मातीची सेवा करण्यात झिजवलं आहे,त्या शेतकरी बापाचा सन्मान झाला पाहिजे ही विनम्रतेची भावना लेखकाने मांडली आहे. वडिलांच्या खांद्यावरती बसून आपण सारं जग पाहतो. ज्याच्यामुळे आपण या जगात आलो आहोत आणि हे जग पाहण्याचा आनंद घेतोय त्या आईबापाला शेवटपर्यंत विसरू नये अशी माफक अपेक्षा लेखकाने या पुस्तकातून केली आहे.प्रत्येकाने आपल्या वडिलांच्याप्रती संवेदनशील असावं आणि कायम कृतज्ञ राहावं असे महत्त्वाचे संदेश या पुस्तकातील अनेक चित्रात आपणास पाहावयाला मिळतात. या पुस्तकातील नुसते चित्र जरी बारकाईने पाहिले, तर माणसाचं माणूसपण जागा होईल आणि त्यांच्या हातून काहीतरी चांगलं घडेल यात शंका नाही.

आपण असं नेहमी म्हणतो, की हजार शब्द बोलण्यापेक्षा एक चित्र काढा, जे चित्र तुमचा संदेश सर्वदूर पोहोचवेल. या वाक्याला पूर्णार्थाने समर्पक ठरेल अशा स्वरूपाची सुंदर चित्रे सोनू दरेगावकर यांनी संग्रहित केली. ती उत्तम पद्धतीने ये पुस्तकाची चितारली. या देखण्या चित्रांना अत्यंत सुंदर बोलक्या म्हणी, चारोळ्या, वचनाने सजवले आहे.

कमी शब्दात मोठा आशय सांगणारे हे पुस्तक नक्कीच येणाऱ्या पिढ्यांसाठी दिशादर्शक ठरेल. पुस्तकाच्या प्रकाशनाच्या पूर्वीच पुस्तकाच्या अनेक प्रती आगाऊच्या बुकिंग झाल्या होत्या, यातच लेखकाचं स्पृहणीय यश आहे.

सोनू दरेगावकर हे आमचे चळवळीतील सहकारी किंवा जिवाभावाचे मित्र आहेत म्हणून त्यांचं हे कौतुक नव्हे,तर ते खरोखर एक प्रेमळ, सोज्वळ आणि चिंतनशील लेखक आहेत म्हणून हे चार शब्द लिहिले आहेत. समाजासाठी सदैव एक पाऊल पुढे ठेवून कार्य करणारा कार्यकर्ता, अडचणी सापडलेल्या माणसाची अडचण दूर करणारा समाजसेवक आम्हाला सोनू दरेगावकर यांच्यामध्ये दिसतो. पुस्तक हातात पडल्यानंतर संपेपर्यंत सुटत नाही हेच या पुस्तकाचं खरं गमक आहे. त्यांच्या भावी लेखन कार्यासाठी मनापासून सदिच्छा!

आपने आपकी तारीफ करना तो फिजल है,
खुशबू तो खुद बता देती है,
की फूल कोनसा है!

प्रा.संतोष देवराये
प्रशिक्षक-मराठा सेवा संघ
महाराष्ट्र. मो.9860820657

# रखरखत्या उन्हात तप्त लोखंडाला आकार देणा-या घिसाडी समाजाला मात्र स्वत:च्या आयुष्याला आकार देता येत नाही; घण लोखंडावर बरोबरच काळजावर सुद्धा; कथा आणि व्यथा विलास पडुळकर घिसाडी कुटुंबाची :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:- ( दि.०९) रखरखत्या उन्हात बाहेरचं ऊन आणि भट्टीची उष्णता मिळुन उष्णतेची जबर झळ सोसुन वजनदार घण मारून तप्त लोखंडाला आकार देण्याचे काम करणाऱ्या घिसाडी समाजातील लोकांना स्वतःच्या आयुष्याला मात्र आकार देता येत नाही. सध्या बीड तालुक्यातील लिंबागणेश या गावी रस्त्याच्या कडेला पिक अप मध्ये अख्खा संसार थाटुन बायको आणि ३ मुलांसह रखरखत्या उन्हात शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारी आणि घरगुती उपयोगाची लोखंडाची हत्यारे अवजारे बनविणे हा यांचा परंपरागत व्यवसाय. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यातील भराडी गावचे विलास कैलास पडुळकर, पत्नी रेणुका, शिवाजी,शिवम आणि कोमल नावाची ३ मुलं. पोटापाण्यासाठी ग्रामीण भागात गावोगावी मुक्काम दर मुक्काम करत पोटाची भुक भागवण्यासाठी धडपड. पुरूषांपेक्षा महिलांचे योगदान जास्तीचे ग्रामीण महाराष्ट्रात घिसाडी समाजातील पारंपारिक व्यवसायात पुरूषांपेक्षा जास्तीचे योगदान महिलांचे.त्यासाठी भट्टी लावणे,तप्त लाल लोखंडावर गरजेप्रमाणे ७ ते १५ किलो वजनाचे घण मारणे.,ग्राईंडर मशिन नसल्याने काणसीने हत्यारे घासणे,बनवलेली अवजारे आसपासच्या गावातील आठवडी बाजारात जाऊन विकणे हि कामे प्रामुख्याने महिलाच करतात. शिवाय सगळी घरगुती आंघोळीसाठी पाणी साठवायचे.



कामे, मुलांना सांभाळणे हि कामे महिलांनाच करावी लागत असल्याचे रेणुका पडुळकर यांनी सांगितले. सांडपाण्याची व्यवस्था नाही. झोपडीशेजारीच गोलाकार खड्डा करून त्यातच कपडे -भांडी धुण्याचे पाणी, शिवाय मुलाबाळांसाठी शौचालयाची सोय नसल्याने पहाटेच उठून या महिलांना शौचासाठी दुर उघड्यावर जावे लागते. शिक्षणाचा गंध नाही, विकासापासून कोसो दुर;

- -

विलास पडुळकर सांगतात त्यांना ३ मुलं दोन मोठे मुलगे शिवाजी आणि शिवम तर धाकटी मुलगी कोमल. यांच्या सोबतच असतात. परंपरागत हाच पोटापाण्याचा धंदा, शिकुन सवरून कामधंद्याला लागल्याचं त्यांच्या पाहण्यात नसल्याने शिक्षणाचे महत्त्व नसल्याने शिक्षणावाचुन काही अडत नाही.शाळा शिकलेल्यांना शिक्षणाचा फायदा झालाय,नोक-या लागल्यात असं त्यांच्या ऐकण्यात सुद्धा नाही. घिसाडी जमातीचे लोक प्राचीन काळी राजपूत सैन्यात ढाली तलवारी तयार करणारे कारागीर,तलवारींना धार लावण्याचे काम करायचे आणि त्यांच्या सोबत युद्धभूमीवर सोबत रहायचे.महाराणा प्रतापसिंहाचे आम्ही वंशज असल्याचे ते अभिमानाने सांगतात.

# मराठा बहुजन समाजाला जोडण्यासाठी जिजाऊ रथयात्रेचे आयोजन

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड-भोकर : मराठा बहुजन समाजात जातीजातीत गटतट पाडून राजकारणाची पोळी भाजणाऱ्या विध्वंसक शक्तीला लगाम घालण्यासाठी आणि मराठा बहुजन समाजाला जोडण्यासाठी महाराष्ट्रात जिजाऊ रथयात्रा काढण्यात आली आहे.असे रथयात्रचे मुख्य सकल्पक प्रा.अर्जुनराव तनपूरे यांनी भोकर येथे जिजाऊ रथयात्रेच्या स्वागत कार्यक्रमात बोलताना सांगितले.संपूर्ण नांदेड जिल्ह्यात जिजाऊ रथ यात्रेचे उत्स्फूर्त स्वागत झाले असून लोकांनी उस्फूर्तरित्या भोकर शहरात देखील प्रचंड स्वागत झाले.जिजाऊ रथयात्रा नांदेड जिल्ह्यात दि ५-एप्रिल ते ७-एप्रिल दरम्यान संपन्न झाली. संभाजी ब्रिगेडचे महासचिव सौरभदादा खेडेकर मराठा सेवा संघाचे प्रा.अर्जुनराव तनपुरे यांच्या नेतृत्वाखाली आलेल्या रथयात्रेचे भोकर शहरात लहुजी साळवे चौकात




लहुजी साळवे अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून जिजाऊ रथ यात्रेची सुरुवात झाली.यावेळी लहुजी साळवे कर्मचारी संघटनेच्या वतीने श्रीधर जाधव यांच्या नेतृत्वाखालील पद्धाधिकाऱ्यांनी जिजाऊंच्या पुतळ्याचे पूजन करून स्वागत केले.रथयात्रेसोबत मराठा सेवा संघाचे प्रदेश सहसचिव प्राचार्य डॉ पंजाब चव्हाण इंजि. शेरा पाटील जिल्हाध्यक्ष सतीश जाधव,पंडितराव कदम,जिजाऊ ब्रिगेड जिल्हाध्यक्षा कल्पना चव्हाण,सुमित्रा वडजकर,वनिता देवसरकर,अर्चना होगे,राणी दळवी,सुनीता कल्याणकर,डॉ राधाकिशन होगे, संभाजी ब्रिगेडचे डॉ गजानन पारधी,उमाकांत उफाडे, नानाराव कल्याणकर ,परमेश्वर पाटील,भगवान कदम आदी पदाधिकारी उपस्थित होते.

तर भोकर येथे तिरुपती पाटील कोंढेकर,सुभाष पाटील किन्हाळकर, इंजी विश्वंभर पवार,गोविंद बाबा गौड,पत्रकार लक्ष्मण हिरे,आनंद शिंधीकर बालाजी सूर्यवंशी,माधवराव तिडके, डॉ पारवेकर,प्रकाश कदम,डॉ व्यंकट माने,बाबूराव जाधव ,मारोतराव जाधव, गजानन कापसे,रावसाहेब मोरे,शिवाजी कदम, सविता मांजरे,डॉ माने सौ.किन्हाळकर, जमुना जाधव,आनंद चिट्टे,बाळासाहेब रावणगावकर यांच्यासह मराठा सेवा संघ,संभाजी ब्रिगेड जिजाऊ ब्रिगेडसह समाज बांधवांनी जिजाऊ रथ यात्रेचे भव्य स्वागत केले.

# महिलांच्या कला गुणांना मिळाली संधी



बीड-प्रतिनिधी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे, मंगळवार (दि.८) रोजी महिलांच्या विविध स्पर्धा पार पडल्या.त्या स्पर्धांना महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला होता. बीड येथील सामाजिक न्याय भवन येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने ४ ते १४ एप्रिल या कालावधीत जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने या जयभिम महोत्सवात महिलांच्या विविध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. त्यामध्ये महापुरुष वेशभूषा, रांगोळी, संगीत खुर्ची आदी स्पर्धा उत्साहात पार पडल्या. महिला स्पर्धा समितीच्या प्रमुख तथा आयोजक अरुणाताई आठवले यांच्या उपस्थितीत सदरील स्पर्धा पार पडलेल्या आहेत. यावेळी विचार मंचावर अध्यक्ष म्हणून शैलजा ओव्हाळ, प्रमुख पाहुणे दीपा रोडे, मायाताई मिसळे, संगीता वाघमारे आदींची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक माया तेलंग, सूत्रसंचालन प्रा.पांडुरंग सुतार, आभार वैशाली चपोडे जोगदंड यांनी केले. दरम्यान जयभिम महोत्सवात साजऱ्या होणाऱ्या कार्यक्रमांना जनतेने उपस्थित राहावे. असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांनी केले आहे.

बीड/महाराष्ट्र
विशेष वार्ता
दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार ११ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com


# पत्रकार संरक्षण कायद्याचं नोटिफिकेशन लवकरच निघणार

पत्रकार संरक्षण कायद्याचं नोटिफिकेशन लवकर काढण्यात येईल, पत्रकार सन्मान योजनेच्या अटी शिथिल करण्यात येतील असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिले. पत्रकारांच्या दहा संघटनांनी एकत्र येत स्थापन केलेल्या पत्रकार अभिव्यक्ती संरक्षण मंचच्या वतीने आज मुख्यमंत्र्यांची भेट घेण्यात आली. जनसुरक्षा विधेयकाच्या संदर्भातील आक्षेप आणि शंकाच्या संदर्भात सह्याद्रीवर ही बैठक झाली. बैठकीस गृह विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीच्या अखेरीस एस.एम. देशमुख यांनी पत्रकार संरक्षण कायद्याचा मुद्दा उपस्थित केला. पत्रकार संरक्षण कायदा झाला पण कायद्याचं नोटिफिकेशन निघाले नसल्याने राज्यात कायदा अंमलात आलेला नाही ही बाब निदर्शनास आणून दिली. त्यावर मुख्यमंत्र्यांनी लगेच नोटिफिकेशन काढण्याची सूचना गृहसचिवांना केली. पत्रकार सन्मान योजनेचे नियम अत्यंत जाचक असल्याने बहुसंख्य ज्येष्ठ पत्रकार या योजनेपासून वंचित आहेत.तेव्हा नियम शिथिल करण्याची मागणी एस.एम.देशमुख यांनी केली त्यावर मुख्यमंत्र्यांनी त्यासंबंधीच्या सूचना संबंधीत अधिका-यांना दिल्या.

# मयत खातेदाराच्या रकमेचा अपहार

## माजलगावच्या पिपल्स अर्बन सोसायटीचा प्रताप; मुलाने बीड एसआयटी कडे तक्रार केल्याने प्रकरण उघडकीस

माजलगाव येथील द. माजलगाव पिपल्स अर्बन को-ऑप सोसायटी लिमीटेड, या संस्थेने मयत महिला खातेदाराच्या खात्यावरील रक्कम चेअरमनच्या नातेवाईकांच्या खात्यावर परस्पर वळती करुन १२ ते १५ लाखांचा अपहार केल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी मयत महिलेच्या मुलाने आर्थिक गुन्हे शाखा (एसआयटी) बीडचे पोलीस निरीक्षक यांच्याकडे केली आहे. हा सोसायटीचा प्रताप उघडकीस येताच माजलगाव शहरात खळबळ उडाली आहे. मल्टीस्टेट आणि अर्बन सोसायट्या यांचे काळे कारनामे बीड जिल्ह्यात दररोज उघडकीस येत आहेत. लोकंही जास्त व्याजदराच्या अमिषाला बळी पडून ठेवी तेथेच ठेवत असल्याने या संस्था चालकांचे फावत आहे. आजही माजलगाव शहरातील द. माजलगाव पिपल्स अर्बन को-ऑप सोसायटी लिमीटेड,चा प्रताप उघडकीस आला आहे. माजलगाव शहरातील मुक्ताबाई यादवराव जाधव यांचे वृद्धापकाळाने ६ ऑक्टोबर २०२४ रोजी निधन झाले. त्या माजलगाव येथे एकट्याच राहून दुग्ध व्यवसाय व किराणा दुकान चालवत होत्या, यातून मिळणारे उत्पन्न त्यांनी द. माजलगाव पिपल्स अर्बन को ऑप सोसायटी लिमीटेड,मध्ये ठेवले होते. त्यांचे निधन होताच चेअरमनच्या भावाच्या खात्यावर काही रक्कम वळती केली. सतत ही रक्कम इतर खात्यांवर वळती करण्यात आली आहे. यामध्ये या अर्बन सोसायटीचा चेअरमन, व्यवस्थापक, आदी सहा जाणांवर मयत महिलेच्या मुलाने संशय घेतला आहे. १२ ते १५ लाखांचे अपहार केल्याचे म्हटले असून, ती रक्कम वारस म्हणून मला देण्यात यावी तसेच अपहार करणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी आर्थिक गुन्हे शाखा (एसआयटी) बीड यांच्याकडे नितीन यादवराव जाधव यांनी केली आहे.

# जि.प.च्या आरोग्य कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन दोन महिन्यापासून रखडले

बीड जिल्ह्यातील सर्व आरोग्य विभागातील कंत्राटी प्राथमिक आरोग्य केंद्र कर्मचारी यांचे माहे फेब्रुवारी व मार्च वेतन तात्काळ अदा करण्यात यावे यासाठी निवेदन श्री आदित्य जीवने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना देण्यात येते की, आरोग्य विभाग प्राथमिक आरोग्य केंद्र कंत्राटी कर्मचारी यांचे वेतन दोन महिन्यापासून झालेले नसून व ईपीएफ हे गेले सात-आठ महिन्यापासून खात्यावर जमा झालेले नाही. मार्च महिना संपला परंतु कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मानधन अद्यापही अदा करण्यात आले नाही. त्यामुळे अनेक कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती आणि इतर सण साजरे करणे कठीण झाले आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र कर्मचाऱ्यांना वेतन आणि ईपीएफ अद्यापही मिळाले नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. गुढीपाडवा,ईद आणि होळीचा सण आर्थिक संकटात गेला असून आता डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या पार्श्वभूमीवर लवकरात लवकर थकित असलेले वेतन व ईपीएफ अदा करण्यात यावे.



# .तर तहानलेल्या नागरिकांसाठी रस्त्यावरील संघर्षाची तयारी - युवा नेते राजेभाऊ फड

परळी वैजनाथ प्रतिनिधी उन्हाची तीव्रता प्रचंड प्रमाणात वाढली असून, एप्रिल महिना असल्याने सूर्य आग ओकत आहे. अशातच पाण्याची मोठी टंचाई जाणवू लागली आहे. त्याचबरोबर पशुपक्षी आणि जनावरांना पिण्याच्या पाण्यासाठी वनवन भटकावे लागत आहे. कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पातील पाणी नदीपात्रात सोडण्यात आले तर त्यामुळे काहीसा दिलासा मिळेल अशी अपेक्षा असल्याने पाणी नदीपात्रात सोडावे ही मागणी गेल्या महिनाभरापासून करण्यात येत आहे. त्यासंदर्भात निवेदने देऊन आणि पत्रव्यवहार करून प्रशासनाला कळवले आहे. येत्या १० तारखेपर्यंत पाणी सोडले नाही तर ११ एप्रिल रोजी कन्हेरवाडी गावात तीव्र रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. याच विषयाच्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची सोमवारी भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची सोमवारी भेट घेतली. वाढती उष्णता आणि त्यामुळे निर्माण झालेली पाणीटंचाई यासंदर्भात त्यांनी वास्तविकतेवर आधारित चर्चा केली. मागील अनेक दिवसांपासून कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पातील पाणी नदीपात्रात सोडण्यात यावे अशी मागणी प्रशासनाकडे करण्यात येत आहे. या प्रकल्पातील पाणी नदीपात्रात सोडण्यात आले तर त्यामुळे कन्हेरवाडी, जिरेवाडी, जलालपूर, ब्रह्मवाडी, समता नगर, बँक कॉलनी, शंकर पार्वती नगर आदी भागातील पाण्याची टंचाई काही प्रमाणात दूर होण्यास मदत होणार आहे. प्रशासनाने या गंभीर प्रश्नाची दखल घेऊन पाणी सोडावे अन्यथा नागरिकांच्या प्रश्नासाठी वेळप्रसंगी संघर्ष करावा लागला तरी तो करण्याची आपली तयारी असल्याची भूमिका राजेभाऊ फड यांनी मांडली. यावर जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी लवकरात लवकर कार्यवाही करू आणि कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पातील पाणी नदीपात्रात सोडण्याचे आदेश देऊ असे आश्वासन दिले आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त माजलगावात समता ज्योत रॅलीचे आयोजन

दि.१३ एप्रिल २०२ रोजी भारतरत्न, संविधान निर्माता, महान समाजसुधारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त समता ज्योत रॅली चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. ही रॅली माजलगाव पोलीस प्रशासन आणि शिव-फुले-शाहू आंबेडकरी अनुयायी, माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केली जात आहे. ही रॅली रात्री ११:०० वा. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून निघून डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक, भीमनगर येथे



समाप्त होणार आहे. या रॅलीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा व विचारसरणीचा जागर, तसेच सामाजिक समतेचा संदेश पोहचविण्यात येणार आहे. उपविभागीय अधिकारी मा. गौरव इंगोले व पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतल यांनी सर्व नागरिकांना या रॅलीमध्ये शिस्तबद्ध व शांततामय पद्धतीने मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. रॅलीदरम्यान पोलीस बंदोबस्त, वाहतूक नियंत्रण व आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात येणार आहेत.

# सहाय्यक पोलिस निरीक्षक महेश मुळीक रुजू

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : उस्माननगर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक चंद्रकांत पवार यांची नुकतीच छत्रपती संभाजीनगर ग्रामीणला बदली झाली असून, त्यांच्या ठिकाणी नांदेड इतवारा ठाण्यातील सहाय्यक पोलिस निरीक्षक महेश मुळीक यांनी उस्माननगर पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारला.



# महावितरण कंपनीकडून अनियमित व कमी दाबाने विद्युत पुरवठा




बीड | प्रतिनिधी महावितरण कंपनीकडून गेल्या काही महिन्यांपासून महावितरण कंपनीकडून अनियमित व कमी दाबाने विद्युत पुरवठा करण्यात येत असल्याने ऐतिहासिक कारंजा टॉवर ते नुरी मस्जिद ते काली मस्जिद आणि बलभीम चौक ते कारंजा टॉवर परिसरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. महावितरण कंपनीचे अभियंता आणि कर्मचाऱ्यांनी या परिसरातील अनियमित विद्युत पुरवठा तसेच कमी दाबाने होत असलेल्या विद्युत पुरवठ्याचा सोक्षमोक्ष लावून विद्युत पुरवठा सुरळीत करावा असे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे. सध्या कडक उन्हाळ्याचे दिवस असल्याने सूर्य आग ओकत आहे. यामुळे सर्वांच्या जीवाची लाहीलाही होत आहे. अशा परिस्थितीमध्ये महावितरण कंपनीकडून विद्युत पुरवठा सुरळीतपणे सुरू ठेवणे अपेक्षित असताना या परिसरात २४ तासातून अनेकदा विद्युत पुरवठा खंडित होत आहे तसेच अत्यंत कमी दाबाने होत आहे. यामुळे विद्युत उपकरणे किंवा साहित्यांना नुकसान होत आहे.



बीडः शहर वाहतूक शाखेत कार्यरत असलेले दत्तात्रय दुधाळ यांची सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकपदी पदोन्नती झाल्याने त्यांना अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर फित लावत असताना.

# छावा चित्रपट व्हायरल करणाऱ्याला मुंबई पोलिसांचा दणका, केली मोठी कारवाई

छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित 'छावा' हा चित्रपट सुपरहिट ठरला. मात्र या चित्रपटाची चित्रफीत बेकायदेशीरपणे सोशल मीडियावर व्हायरल करणाऱ्या एका व्यक्तीला मुंबई सायबर पोलिसांनी अटक केली आहे. पुण्यात ही कारवाई करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सागर माणिक रंधावन (रा. दौंड, पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. सागर रंधावनने 'छावा' चित्रपट सोशल मीडियावर अपलोड करण्यासाठी होस्टिंगर या वेबसाईटचा वापर केला. त्यानंतर त्याने एक ॲप तयार केले. यानंतर विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा वापर करत या चित्रपटाच्या लिंक्स अपलोड केल्या.१३ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी

या चित्रपटाची लिंक मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्यानंतर ऑगस्ट इंटरटेनमेंट या चित्रपट निर्मिती कंपनीने सायबर पोलिसांकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी तपास सुरू केला. यानंतर पोलिसांनी सागर रंधावन याला अटक केली. याप्रकरणी आरोपीला न्यायालयात हजर केले असता, त्याला १३ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. सध्या या घटनेचा पुढील तपास मुंबई सायबर पोलीस करत आहेत.१८१८ लिंक्स व्हायरल

लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित आणि अभिनेता विकी कौशलची प्रमुख भूमिका असलेला 'छावा' हा चित्रपट १४ फेब्रुवारी रोजी बॉक्स ऑफिसवर प्रदर्शित झाला. या चित्रपटाने करोडोंची कमाई केली. मात्र दुसरीकडे या चित्रपटाला पायरसीचे ग्रहण लागले. हा चित्रपट इंटरनेटवर १८१८ लिंक्स तयार करून व्हायरल करण्यात आला. 'छावा' हा चित्रपट व्हायरल केल्याप्रकरणी रजत राहुल हक्सर यांनी तक्रार दाखल केली होती. याप्रकरणी भारतीय न्याय संहिता (BNS) च्या कलम 316(2) आणि 308(3) अंतर्गत कॉपीराईट कायद्याच्या कलम 51, 63, आणि 65A सह सिनेमॅटोग्राफ कायदा, 1952 चे कलम 6AA (सुधारणा आणि तंत्रज्ञान अधिनियम 236 आणि माहिती 2360 च्या कलम 360) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

'छावा' या चित्रपटाचे दिग्दर्शन लक्ष्मण उतेकर यांनी केले होते. या चित्रपटात विकी कौशल हा छत्रपती संभाजी महाराजांच्या भूमिकेत झळकला होता. तर त्यांची पत्नी येसुबाईंची भूमिका अभिनेत्री रश्मिका मंदानाने साकारली होती. तसेच औरंगजेब ही भूमिका अभिनेता अक्षय खन्नाने साकारली आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला १०० दिवसांच्या कृती आराखड्याचा आढावा

## सर्व विभागांनी कालमर्यादेत कार्यवाही पूर्ण करावी- जिल्हाधिकारी राहुल कर्डीले

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : राज्य शासनाच्या निर्देशानुसार राबवण्यात येणाऱ्या १०० दिवसांच्या कृती आराखड्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात विविध विभाग प्रमुखांची बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी सर्व कार्यालयात आराखड्यानुसार सुरू असलेल्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला व प्रत्येक विभागाने निश्चित केलेल्या कालमर्यादेत दिलेल्या उद्दिष्टांनुसार कार्यवाही पूर्ण करण्याचे निर्देश दिले. या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल इंगळे, वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत मंजुषा कापसे, अपर पोलीस अधिक्षक सुरज गुरव तसेच विविध विभाग प्रमुखांची उपस्थिती होती. या बैठकीत राज्य शासनाने प्रत्येक कार्यालयाला दिलेल्या १०० कृती आराखड्यानुसार दिलेल्या कालावधीत करावयाच्या कार्यवाहीबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्येक विभाग प्रमुखांनी आतापर्यत केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर आढावा घेतला. तसेच शासनाने दिलेल्या कृती आराखड्यानुसार नांदेड जिल्हा राज्यात अव्वल राहील याद्दष्टीने प्रत्येक विभागाने आपले काम विहित वेळेत पूर्ण करावेत अशा सूचना त्यांनी दिल्या. १०० दिवसांच्या आराखड्यानुसार संकेतस्थळ व माहिती अद्ययावतकरण यामध्ये सर्व कार्यालयांनी त्यांच्या संकेतस्थळावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत आवश्यक माहितीचे स्वयंप्रकटीकरण करावे. संकेतस्थळ नागरिकांसाठी उपयुक्त, सुलभ आणि माहितीपूर्ण असावे. नागरिकांना मिळणाऱ्या सेवांमध्ये कमीत



कमी दोन सेवा सुलभ करण्याच्या दृष्टीने नव्या कार्यपद्धती राबवाव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी दिले. स्वच्छता व अभिलेख व्यवस्थापन यामध्ये कार्यालयातील स्वच्छता कायम राखण्यावर भर देत, निंदनीय व नष्ट करण्यायोग्य अभिलेखांचे वर्गीकरण आणि प्रक्रिया तात्काळ राबवण्याचे आदेश दिले. तक्रारींचे जलद निराकरण यामध्ये आपले सरकार पीजी पोर्टल आदी माध्यमांतून प्राप्त झालेल्या नागरिकांच्या तक्रारींचा पूर्ण निपटारा करावा. तसेच लोकाभिमुख प्रशासनासाठी उपाय यात नागरिकांसाठी कार्यालयात दर्शनी भागात अभ्यागत भेटीच्या वेळेची माहिती फलकावर असावी. ग्रामस्तरावरील कामकाजावर लक्ष यावाबीत अधिकारी वर्गाने आठवड्यातून किमान एकदा क्षेत्रीय कार्यालयांना भेट देवून ग्रामपंचायती, आरोग्य केंद्र, शाळा व अंगणवाड्यांच्या कामकाजाची पाहणी करावी. 100 दिवसांचा कृती आराखडा म्हणजे केवळ औपचारिकता न राहता, त्यातून नागरिकांना फायदा होईल याची प्रत्येक विभागाने काळजी घ्यावी. प्रशासन हे नागरिकाभिमुख, पारदर्शक व कार्यक्षम असावे यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी दिले. यावेळी जिल्हा प्रशासनाच्यावतीने शासकीय कामकाजात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) चा वापर याबाबतचे पीपीटीद्वारे सादरीकरण करण्यात आले.

# आकाची टोळी अजूनही कार्यरत-आ.धस

आकाची लोक आजही कार्यरत आहेत. या लोकांनी याआधीही वॉचमनला मारहाण केली म्हणून एवढं सगळं घडलं. आजही मआकाफ्ची टोळी कार्यरत आहे, असा मोठा गौप्यस्फोट आमदार सुरेश धस यांनी केला. दोन दिवसापूर्वी मस्साजोग गावातील आवादा कंपनीमध्ये १२ लाख किंमतीच्या केबलची चोरी झाल्याचे समोर आले होते. चौरट्यांनी वॉचमनला बांधून ठेऊन ही चोरी केली होती. या प्रकरणावरुन आता राजकीय वतुळात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. आज आमदार सुरेश धस यांनी माध्यमांसोबत संवाद साधत असताना मोठा गौप्यस्फोट केला. आमदार धस म्हणाले, या लोकांनी दलित समाजातील वॉचमनला मारहाण केली होती. आताही मआकाफ्याच कोणत्यातरी सहकाऱ्याने हे केले असेल. दोन दिवसात आरोपी सापडेल, त्यांची टोळी आजही कार्यरत. मआकाफ्ने जे लोक जागोजागी ठेवले आहेत ते आजही आहेत. त्यांच्या बदल्या झालेल्या नाहीत, ते त्रासदायक आहेत, असंही धस म्हणाले.

वातावरणामुळे राज्यातील तापमानात वाढ होत आहे. मध्यभारतासह आणि उत्तर-पश्चिम राज्यासह संपूर्ण महाराष्ट्रात येत्या तीन दिवसांत कमाल तापमानात दोन ते चार अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता आहे. विदर्भात वाढत्या उष्णतेचा सर्वाधिक फटका बसत असला तरीही मुंबईसह ठाणे शहरात देखील तापमान वाढ होत आहे. सोमवारी ठाण्यात देखील ४२ अंश सेल्सिअस इतक्या विक्रमी तापमानाची नोंद करण्यात आली. येत्या काही दिवसात त्यात आणखी वाढ होण्याची देखील शक्यता आहे. त्यामुळे विदर्भातील इतर शहरांसोबतच ठाण्यातही उष्णतेची लाट जाणवत आह

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार ११ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com



# बीड सायबर पोलिसांची गुजरातमध्ये डील!

## पोलीस उपनिरीक्षक रणजीत कासलेंनंतर आणखी दोन पोलिस निलंबित

बीड : परवानगी न घेता आरोपी घेऊन गुजरातमध्ये गेले. तेथे गेल्यावर कोट्यवधी रुपयांची डील केल्याचा आरोप झाला. प्राथमिक चौकशीत दोषी आढळल्याने सायबर पोलिस ठाण्यातील पोलिस उपनिरीक्षक रणजीत कासले यांचे निलंबन झाले होते. आता त्यांच्यासोबत गेलेले हवालदार रामदास गिरी आणि चालक बळीराम भाग्यवंत यांनाही बुधवारी निलंबित करण्यात आले आहे. एकाच पोलिस ठाण्यातील तिघांना निलंबित करून पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी चुकीचे काम करणाऱ्यांना दणका




दिला आहे. यामुळे ठाणेदारही अडचणीत आले असून, कारवाईची टांगती तलवार त्यांच्यावर आहे. सायबर पोलिस ठाण्यात २०२४ मध्ये फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला होता. त्याचा तपास पोलिस निरीक्षक देविदास गात यांच्याकडे होता. त्यात एक आरोपी अटक केला. त्याची पोलिस कोठडी घेण्यात आली होती, परंतु याच पोलिस ठाण्यातील उपनिरीक्षक रणजीत कासले, हवालदार रामदास गिरी आणि चालक बळीराम भाग्यवंत हे तिघे जण खासगी वाहनाने या आरोपीला घेऊन गुजरात राज्यात गेले. त्या आधी त्यांनी पोलिस अधीक्षक नवनीत काँवत अथवा छत्रपती संभाजीनगरचे विशेष पोलिस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र यांची परवानगी घेतली नाही. त्यानंतर गुजरातमध्ये गेल्यानंतरही त्यांनी एका व्यक्तीकडे पैशांची मागणी केली. त्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. या प्रकरणात पोलिस अधीक्षक काँवत, अपर अधीक्षक सचिन पांडकर यांनी चौकशी करून कासले यांना तडकाफडकी निलंबित केले होते, तर गिरी आणि चालक भाग्यवंत यांची चौकशी केजचे सहायक अधीक्षक कमलेश मिना यांच्याकडे सुरू होती. त्याचा अहवाल प्राप्त होताच बुधवारी या दोघांचेही निलंबन करण्यात आले



# ॲड.निकमांकडून मारहाणीचा व्हिडीओ कोर्टात सादर करताना वाल्मिक कराडच्या मालमत्तेच्या जप्तीचा अर्ज

बीड। प्रतिनिधी संतोष देशमुखांना मारहाण करताना आरोपींनीच व्हिडीओ काढला होता असे सांगत तो व्हिडीओ न्यायालयात सादर करून त्याची गोपनीयता पाळावी अशी विनंती करणाऱ्या ॲड.उज्वल निकम यांनी वाल्मिक कराडची स्थावर आणि जंगल मालमत्ता जप्त करण्या संदर्भात न्यायालयात अर्ज दाखल केला. तर वाल्मिक कराडचे वकील ॲड. विकास खाडे यांनी वाल्मिक कराड हे निर्दो श असून त्यांची मुक्तता करावी असा अर्ज न्यायालयात सादर केला आहे. गुरूवारी झालेल्या सुनावणीत आरोपींना व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे हजर करण्यात आले होते. आता या प्रकरणाची पुढील तारीख २४ एप्रिल ही देण्यात आली आहे. बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाची आज (गुरूवारी, ता १०) विशेष मकोका न्यायालयात सुनावणी पार पडली आहे. या सुनावणीसाठी सरकारी वकील उज्ज्वल निकम उपस्थित होते. सरपंच संतोष देशमुख यांची ४ महिन्यापूर्वी अपहरण करून निघृ णपणे हत्या करण्यात आलेली होती. त्यानंतर अनेक धक्कादायक खुलासे समोर आले होते. या प्रकरणाचा खटला सध्या बीडच्या जिल्हा सत्र न्यायालयात सुरू आहे. त्यावर आज विशेष मकोका कोर्टात सुनावणी पार पडली आहे. आज ११ वाजता ही सुनावणी पार पडली आहे. त्यासाठी सरकारी वकील उज्ज्वल निकम हे काल रात्रीच बीडमध्ये दाखल झालेले आहेत. आजच्या सुनावणीमध्ये आरोपीचे वकील ड, विकास खाडे यांनी युक्तीवाद केला. पुढची सुनावणी २४ एप्रिल रोजी होणार असल्याची माहिती आहे. आरोपीच्या वकिलांनी जे कागदपत्र मागितली होती ती कागदपत्र दिली गेली आहेत. तर फॉरेन्सिक लॅबमधून आलेले पुरावे तपासून पुढील तारखेला आरोपीच्या वकिलांना दिली जाणार आहे अशी माहिती आहे. वाल्मीक कराड याचे डिस्चार्ज ॲप्लिकेशन आज दाखल करण्यात आले असल्याचे वकील विकास खाडे यांनी सांगितले आहे दरम्यान याबाबत सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी कोर्टातील युक्तीवाद संपल्यानंतर पत्रकार परिषद घेतली. यामध्ये त्यांनी या प्रकरणातील महत्त्वाची काही माहिती दिली आहे. आरोपी वाल्मीक कराडच्या वकीलांनी काही कागदपत्रे मागतील ती दिली आहेत. सीलबंद दस्तावेज आहेत ते शील उघडल्यानंतर देऊ. वाल्मिक कराड याने डिस्चार्ज अर्ज केला आहे. न्यायालयात संतोष देशमुखांना मारहाण केल्याचा व्हिडीओ दिला आहे. आम्ही विनंती केली हा व्हिडिओ बाहेर प्रसारित होऊ नये. यामुळे कायदा सुव्यवस्था प्रश्न निर्माण होईल, अशी माहिती देखील ॲड. उज्वल निकम यांनी दिली आहे. सुनावणी संपल्यानंतर ॲड.उज्वल निकम यांनी माध्यामांना याबाबत माहिती दिली, आरोपीच्या वकिलांनी मागितलेला कागदपत्र सादर केली. संतोष देशमुखांच्या मारहाणीचा व्हिडीओ न्यायलयात हजर केला आहे. व्हिडीओ आरोपींनीच रेकॉर्ड केला आहे. हा व्हिडीओ बाहेर येऊ नये,अशा विनंती कोर्टाला केली, अशी माहिती निकम यांनी दिली. आरोपी वाल्मिक कराडची चल आणि अचल संपत्तीवर रितसर सुनावणी होईल. वाल्मिकने या प्रकरणात तो सहभागी नाही,असा अर्ज केला आहे. डिस्चार्जमध्ये अनेक मुद्दे मांडले आहेत. या गुन्ह्यात वाल्मिक कराडचा सहभाग नाही आणि इतर बाबी या अर्जात आहेत. सीआयडीकडून वाल्मिक कराडच्या संपत्तीवर तपास सुरू आहे, असंही उज्वल निकम यांनी सांगितले आहे.पुढची सुनावणी २४ एप्रिल रोजी होणार असल्याची माहिती आहे.

## राधाकृष्णनगरी येथे हनुमान जयंती निमित्त भक्तिमय वातावरणात सप्ताहाला सुरुवात

बीड : दरवर्षीप्रमाणे याही वर्षी राधाकृष्ण नगरी पांगरी रोड बीड येथे पंचमुखी हनुमान मंदिर येथे राम नवमी व जन्म राम नवमी हनुमान जयंतीनिमित्त सप्ताहाचे नियोजन करण्यात आलेला आहे या सप्ताहामध्ये सकाळी सात ते नऊ या वेळेमध्ये ज्ञानेश्वरी पारायण आहे तसेच सायंकाळी पाच ते सहा वेळेमध्ये हरिपाठ व रात्री साडेसात ते साडेनऊ या वेळेमध्ये कीर्तनाचे नियोजन करण्यात आलेली आहे किर्तनानंतर आलेल्या सर्व भाविक भक्तांना प्रसादाची महापंगत होत आहे या पणतीसाठी राधाकृष्णनगरी व रेणुका नगरी तसेच सर्व भाविक भक्तांचे मोलाचे सहकार्य लाभलेले आहे या सप्ताहामध्ये दिनांक १० ४ २०२५ वार गुरुवार या दिवशी बाबुराव महाराज मुंडे यांचे रात्री साडेसात ते साडेनऊ या वेळेमध्ये कीर्तन होईल तसेच दिनांक ११ ४ २०२५ वार शुक्रवार रोजी रात्री साडेसात ते साडेनऊ या वेळेमध्ये शिवचरित्रकार प्रतिभाताई पाटील गायकवाड केतूरेकर यांचे कीर्तन होईल तसेच १२ ४ २०२५ यांचे अमृततुल्य कीर्तन होईल हरिभक्त परायण सुरेशानंद जी महाराज कोळेकर श्री क्षेत्र संस्थान सु ंदरशी गड यांचे कीर्तन अमृततुल्य असे आहे शनिवारी सकाळी साडेअकरा ते दीड या वेळेमध्ये काल्याचे किर्तन होईल त्यानंतर लगेच महापत्त्याची पंगत होईल तरी या महाप्रसादाचा सर्वांनी लाभ घ्यावा अशी विनंती राधाकृष्णनगरी रेणुका नगरी तसेच सप्ताह कमिटी आयोजक यांची आग्रहाची विनंती आहे या सप्ताहामध्ये ज्या भाविक भक्तांना देणगी स्वरूपाची मदत करायची आहे त्यासाठी सप्ताहाच्या धर्म मंडपामध्ये देणगी काउंटर चालू आहे तसेच ऑनलाईन सुविधाही उपलब्ध आहे तसेच या सप्ताहामध्ये ऑनलाईन चित्रीकरण होत आहे युट्युब वरती ही छायाचित्रण होत आहे.

## महावीर जंयतीनिमित्त कत्तलखाने व मांस विक्रीचे दुकाने बंद ठेवावेत -नगराध्यक्ष जिया बेग

आष्टी । प्रतिनिधी आष्टी शहरात जैन धर्मातील महान तीर्थंकर यांचा जन्मदिवस म्हणून महावीर जयंती आष्टी शहरात मोठ्या उत्साहात साजरी केली जाणार आहे. शहरातील आज गुरुवार दि.१० एप्रिल रोजी महावीर जंयतीनिमित्त दिवसभर कत्तलखाने व मांस विक्रीचे दुकाने बंद ठ ेवण्याचा निर्णय आष्टी नगर पंचायतच्यावतीने घेण्यात आला असल्याची माहिती आष्टी नगर पंचायतचे नगराध्यक्ष जिया बेग यांनी दिली. आष्टी शहरात जैन धर्मातील महान तीर्थंकर यांचा जन्मदिवस म्हणून महावीर जयंती शहरात मोठ्या उत्साहात साजरी केली जाणार असून जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे याच पार्श्वभूमीवर शहरातीलगुरुवार दि. १० एप्रिल रोजी महावीर जयंती साजरी होणार आहे.यामुळे आष्टी शहरातील गुरुवार दि.१० एप्रिल रोजी महावीर जंयतीनिमित्त दिवसभर कत्तलखाने व मटण,चिकन,मासे, विक्री करणारे सर्व दुकाने बंद ठेवण्यात येणार आहेत. मांसविक्री होणार नाही.असा निर्णय आष्टी नगरपंचायत यांनी निर्णय घेतला आहे.या आदेशाचे विक्र ेत्यांनी पालन करावे असे आवाहनही नगराध्यक्ष जिया बेग यांनी केले आहे.

# कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी लवकरच नदीपात्रात सोडणार!

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) उन्हामुळे निर्माण झालेली पाणीटंचाई आणि पशुपक्षी तसेच जनावरांना पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष असल्यामुळे कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्र ेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते तथा कन्हेरवाडीचे माजी सरपंच राजेभाऊ फड यांनी केली होती. गुरुवारी प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गावाला भेट देऊन शुक्रवारी होणारे रस्ता रोको आंदोलन स्थगित करण्याची विनंती करून पाणी सोडण्याचे ठोस आश्वासन दिले. राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती जवळ आलेली असून आंदोलनामुळे जयंतीच्या उत्साहात व्यत्यय येऊ नये यासाठी आम्ही हे आंदोलन स्थगित करत आहोत. येत्या २० एप्रिल पर्यंत पाणी सोडले नाही तर २२ एप्रिल रोजी रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा राजेभाऊ फड यांनी दिला आहे. याबाबत अधिक असे की, कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्र ेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांच्याकडे केली होती. पाणी न सोडल्यास दिनांक ११ एप्रिल २०२५ रोजी रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार होते. आंदोलनाच्या पूर्वसंध्येला परळीचे



तहसीलदार व्यंकटेश मु ंडे, पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता लोंढे, तलाठी विष्णू गित्ते, परळी ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महझरअली तसेच प्रशासनातील अन्य अधिकाऱ्यांनी कन्हेरवाडी गावात जाऊन हनुमान मंदिर येथे बैठक घेऊन ग्रामस्थांशी चर्चा केली. १४ एप्रिल रोजी राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती आहे. देशभरात याचा मोठा उत्साह असतो. आंदोलनामुळे कुठल्याही कार्यक्रमात व्यत्यय येणार नाही अशी भूमिका यावेळी घेण्यात आली. तसेच येत्या २० एप्रिल पर्यंत पाणी नदीपात्रात सोडण्याची कारवाई होईल असे आश्वासन तहसीलदार यांनी देऊन उद्याचे आंदोलन स्थगित करण्याची विनंती केल्यानंतर रास्ता रोको स्थगित करण्यात आला. प्रशासनाच्या विनंतीला मान देऊन आम्ही आंदोलन स्थगित केले आहे, मागे घेतलेले नाही. २० एप्रिल पर्यंत पाणी नदीपात्रात सोडण्यात आले नाही तर येत्या २२ एप्रिल रोजी स्थगित केलेले आंदोलन करण्यात येईल असा इशारा माजी सरपंच राजेभाऊ फड यांनी दिला.

# केतुरा गावचे विद्यमान सरपंच परमेश्वर नाना तळेकर यांना राज्यस्तरीय समाज भूषण पुरस्कार जाहीर, व सरपंच सेवा संघाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी निवड

## सिने अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्या हस्ते होणार तळेकर यांचा गौरव

बीड प्रतिनिधी अंकुश गवळी,

बीड जिल्ह्यातील सर्व सरपंच्यांच्या नावा मध्ये सर्वात चर्चेत असणारे नाव म्हणजे बीड तालुक्यातील केतुरा गावचे लोकनियुक्त सरपंच परमेश्वर नाना तळेकर नुकताच त्यांना सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्य यांच्या जिह्लाध्यक्ष पदी नियुक्ती देण्यात आली ,2 वर्ष 3 महिन्या पुर्वी तळेकर यांनी ग्रामपंचायतचा पदभार स्वीकारला साधे ग्रामपंचायत भवन आणि स्मशान भूमी नसलेल्या गावचा विकास करण्या साठी त्यांनी निस्वार्थी पणे काम सुरू केले, युवकांना व्यसना पासुन दुर करण्यासाठी केतुरा गावच्या इतिहासातील पहिली व्यसन मुक्त मोहिम राबवली ,गावचा पाणी प्रश्न दुर करण्यासाठी नदी खोलिकरण केले ,गावात झाडे वाटप असो की प्रत्येक 5/6 महिन्यानंतर आरोग्य शिबीर आयोजन असो ,गावातल्या जिह्ला परिषद शाळेची सुधारणा गावातील विद्यार्थ्यांना मोफत अभ्यासिका सुरू करणे ,प्रत्येक गावातील नागरीकांचे वैयक्तिक लाभाचे कामे लक्ष पुर्वक करणे या सर्व गोष्टींमुळे ते नेहमी चर्चेत असतात ,गावातील सिमेंट रस्ते , प्युअर ब्लॉक बसवणे , पथदिवे असे



कामे अगदी चोखपणे पुर्ण झाले आहेत ,नवनिर्वाचीत ग्रामपंचायत भवनचे काम ही अंतीम टप्प्यात आहे ,गावातील युवकांची ओढ शिक्षणांकडे आणि वैयक्तिक सुधारणे कडे असावी ,या साठी नानांची नेहमी त्यांना प्रोत्सहानाची थाप असते,, बीड तालुक्यातील केतुरा गावातील विद्यमान सरपंच परमेश्वर नाना तळेकर यांना सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्य आयोजित राज्यस्तरीय समाज भूषण पुरस्कार जाहीर झाला आहे, परमेश्वर तळेकर गेल्या अनेक वर्षापासून बीड जिल्ह्याच्या सामाजिक राजकीय शिक्षण क्षेत्रात अग्रेसर आहेत, वारकरी संप्रदायामध्ये पाईक अशी त्यांची एक आगळी ओळख बीड जिल्ह्यामध्ये आहे, तळेकर यांच्या सामाजिक शैक्षणिक कार्याची दखल घेऊन सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्य च्या कमिटीने त्यांना पुरस्कार जाहीर केला आहे, व त्याबरोबर त्यांना सरपंच सेवा संघाचे जिह्लाध्यक्ष पद सुद्धा देण्यात आलेले आहे, सरपंच सेवा संघटनेचे मार्गदर्शक यादवराव पावसे, बाबासाहेब पावसे, सरपंच संघटित चळवळीतील नेते, रोहित पवार प्रदेशाध्यक्ष सरपंच सेवा संघ, अमोल शेवाळे संपर्कप्रमुख, केतुरा येथील ग्रामपंचायत सदस्य ,वंसत सिरसट, उपसरपंच संगीता मच्छिंद्र गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य मधुमती कचरू गिरी , सुदर्शन घाडगे ,सोसायटी चेअरमन रामनाथ रहाडे ,उप चेअरमन बाबासाहेब शिरसाठ व मौजे केतुरा येथील येथील अनेक जेष्ठ लोकांच्या सहभागातून हे साध्य झाले असल्याचे प्रतिपादन केतुरा गावचे विद्यमान सरपंच परमेश्वर नाना तळेकर यांनी केले आहे, पुरस्कार वितरण सोहळा 13. एप्रिल, 2025, रोजी सकाळी 11 वाजता स्थळ माऊली संकुल सभागृह सावेडी रोड अहिल्यानगर, या ठिकाणी होणार आहे, तळेकर यांना समाज भूषण पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांना महाराष्ट्र राज्यातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com